# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

CAM Cycling Association Of Maharashtra

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९

ॲड. विक्रम रोठे अध्यक्ष | प्रताप जाधव संघटन सचिव | प्रा. संजय साठे सचिव | भिकन अंबे खजिनदार


## अत्यंय महत्वाचे व तातडीचे परिपत्रक

**संदर्भ क्रमांक** : स्टेटएमटीबी/२०२२-२३/पान क्र.१
**दिनांक:** ८ जून २०२३

प्रती,
**मा. अध्यक्ष / मा. सचिव**
सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला
संलग्न सर्व जिल्हा संघटना / क्लब / सायकलपट्टू व संबंधीत सर्व
स.न.वि.वि.

**विषय: ३री महाराष्ट्र राज्य एमटीबी सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा २०२२-२३ बाबत....**
**संदर्भ: कॅम चे दि.२९ मे २०२३ रोजीचे चे परिपत्रक पहावे.**

महोदय / महोदया,

१) सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला संलग्न असलेल्या सभासद सर्व सायकलिंग जिल्हा संघटनांचे नोंदणीकृत सायकलपट्टू व संबंधीतांसाठी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रतर्फे सन २०२२-२३ सालची ३री महाराष्ट्र राज्य एमटीबी सायकलिंग (मास स्टार्ट व टाईम ट्रायल - Mass Start & Time Trial) **अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन २४ व २५ जून २०२३ दरम्यान आळंदी, जिल्हा पुणे येथे करण्यात आले आहे.**

२) **आळंदी येथे दिनांक २४ जून २०२३ रोजी सकाळी ०९:०० ते १२:०० पासून पूज्य बन्सीलाल कारवा धर्मशाळा, आळंदी - चाकण रोड, आळंदी ४१२ १०५ येथे रीपोर्टिंग आणि रायडिंग क्रमांक (BIB No.) वाटप होईल. दुपारी १२:१५ वाजता तेथेच सर्व संबंधीतांची बैठक होईल, या बैठकीस सर्व सायकलपट्टू, पंच, व्यवस्थापक, प्रशिक्षक, पालक यांनी हजर राहवे. यावेळी सर्व सूचना देण्यात येतील. या बैठकीस गैरहजर असल्याने काही सूचना मिळाल्या नाही तर त्यास आयोजक वा सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र जबाबदार असणार नाही, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीतांची राहील.**

**३) शनिवार, दिनांक २४ जून २०२३ रोजी दुपारी ०२:०० वाजता स्पर्धे ठिकाणी रिपोर्टींग आणि ३०० वाजता सर्व वयोगटातील टाईम ट्रायल स्पर्धा होतील. रविवार, दिनांक २५ जून २०२३ रोजी सकाळी ६:०० वाजता स्पर्धे ठिकाणी रीपोर्टींग व सकाळी ७:०० पासून सर्व वयोगटातील मास स्टार्ट स्पर्धा होतील आणि दुपारी १:०० वाजता ज्युनिअर आणि सिनीअर वयोगटातील मिस्क टीम रीले स्पर्धा होतील. (सविस्तर वेळापत्रक वेबसाईटवर जाहीर करण्यात येईल)**

४) या राज्य एमटीबी सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठीचे वयोगट (जन्मतारखेसह), ईव्हेंटलीस्ट सोबत जोडली आहे. (या स्पर्धा सन २०२२-२३ च्या असल्याने वयोगट २०२२ चा ग्राह्य धरण्यात आला आहे.)





पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

५) आयोजक सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने शनिवार दिनंक २४ जून २०२३ रोजीची सायकलपटूंची निवास व्यवस्था करण्यात आली आहे, मिटींगचे ठिकाणी निवास व्यवस्थेचे ठिकाण सांगण्यात येईल. (शनिवार दिनांक २४ जून २०२२ रोजी दुपारी १२:०० नंतर निवास व्यवस्था उपलब्ध होईल). **नांव नोंदणीवेळी निवास व्यवस्था हवी आहे असे सांगितलेल्या सायकलपटूंसच निवास व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात येईल.**

६) भोजन व्यवस्था प्रत्येक सायकलपटूने स्वत:ची स्वत: करावयाची आहे.

**७) जिल्हा संघटनांनी आपल्या सायकलपटूंची नोंदणी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे करुन घेणे बंधनकारक आहे. ज्या सायकलपटूंची नोंदणी आहे आणि ज्यांच्याकडे रीन (RIN Rider's Identification Number) आहे अशाच सायकलपटूंना राज्य अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होता येईल.**

८) रीन नंबर मिळवण्यासाठी **कॅम CAM च्या वेबसाईट वरुन लिंक द्वारे महिती भरता येईल. आपण योग्य ती सर्व माहिती दिल्यानंतर पुढील २४ तासात आपणांस रीन नंबर मिळेल त्यानंतर सायकलपटूस स्पर्धा व पुढील सर्व माहिती ईमेलद्वारे देण्यात येईल.**

९) सायकलपटूने सीएफआय चे रायडिंग लायसेन्स काढून घेणे बंधनकारक नाही. मात्र भविष्यात ज्या सायकलपटूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी होईल त्यांना सीएफआय लायसेन्स तयार करुन घेणे बंधनकारक राहील.

१०) **रीन नंबर मिळाल्यानंतर आपणांस सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचा नोंदणी फॉर्म व इतर माहिती मेलद्वारे पाठवण्यात येईल. प्रत्येक सायकलपटूने नोंदणी फॉर्म व इतर सर्व फॉर्म भरुन आळंदीला घेऊन यायचे आहेत. जे आळंदीला स्पर्धेसाठी येणार नसतील त्यांनी ते पुढील पत्त्यावर पाठवावेत. प्रताप जाधव, संघटन सचिव, डी-१८, अनिकेत हौसिंग सोसायटी क्र १, बिबवेवाडी रोड, पुणे ४११ ०३७.**

११) **आळंदी येथे होणा-या स्पर्धेसाठी प्रवेशिका प्रत्येकाला पाठविण्यात येणा-या लिंकद्वारे भरावयाची आहे. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे आळंदी येथील स्पर्धेच्या प्रवेशीका स्वीकारण्यात येणार नाहीत**.

१२) आळंदी येथील स्पर्धेच्या प्रवेशिका मंगळवार दिनांक २० जून २०२३ पर्यंत स्वीकारण्यात येतील.

१३) **उशीरा आलेल्या प्रवेशिका नाकारण्याचा किंवा लेट फी सह स्वीकारण्याचा अधिकार** सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचा राहील.

**१४)** सायकलपटूंच्या प्रवेशिका उशिरा मिळाल्यामुळे स्पर्धा आयोजनामध्ये खूप अडचणी येतात. त्यासाठी प्रवेशिका वेळेत पाठविण्याची जबाबदारी संबंधीत सायकलपट्टूची राहील. उशिरा



**पत्रव्यवहाराचा पत्ता**

डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**

इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**

**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com

**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

आलेल्या प्रवेशिकेस सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, जिल्हा सायकलिंग असोसिएशन किंवा आयोजक वा पुरस्कर्ते जबाबदार असणार नाहीत.

**१५) स्पर्धेमध्ये प्रत्येक खेळाडूने आपल्या जिल्ह्याचा टी-शर्ट वापरणे आवश्यक आहे.**

१६) प्रत्येक ईव्हेंटसाठी प्रत्येक सायकलपटूस पाचशे रूपये खर्च व नोंदणी आकार राहील.

**१७) सायकलपटूस केवळ एका वयोगटात भाग घेता येईल. एकापेक्षा जास्त वयोगटात भाग घेता येणार नाही.**

१८) जिल्हा संघटनांकडून किंवा वैयक्तीकरीत्या आयत्या वेळी (स्टार्टिंग लाईनवर / स्पर्धे ठिकाणी) नांव नोंदणी कोणत्याही परिस्थीतीमध्ये होणार नाही.

१९) प्रत्येक जिल्हा संघाबरोबर दोन अधिकाऱ्यांची (एक पुरुष आणि एक महिला अधिकारी असावा) निवास व्यवस्था करण्यात आली आहे. जास्त अधिकारी आढळल्यास वा येऊ इच्छित असल्यास सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे रुपये ५०० प्रत्येकी आगावू भरून परवानगी घ्यावी लागेल.

२०) **जिल्हा संघाबरोबर प्रशिक्षक / व्यवस्थापक वा अधिकारी म्हणून जिल्हा संघटनांनी सायकलपटूच्या पालकांस पाठवू नये. तसे पाठविल्यास जिल्हा संघटनेस प्रत्येकी रुपये २५००/- दंड द्यावा लागेल.**

**२१) भारतीय सायकलिंग महासंघाशी (सीएफआय) संलग्न असलेल्या सेनादल, रेल्वे क्रीडा मंडळ आदी संस्थांमधील खेळाडूंना तसेच महाराष्ट्र सोडून इतर राज्यातील सायकपट्टूंना या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. महाराष्ट्राचा अधिवास असलेल्या सायकलपट्टूंनाच या स्पर्धेत सहभागी होता येईल.**

**२२) ज्या जिल्ह्याचा रहिवाशी असेल किंवा ज्या जिल्ह्यात शिक्षण वा नोकरी करत असेल त्या जिल्ह्याकडूनच सहभागी होता येईल. एका वर्षात एकाच जिल्हामधून सहभागी व्हावे लागेल.**

**२३) पंचांच्या निर्णयाविरूद्ध हरकत घ्यावयाची असेल तर ती निकाल जाहीर केल्यानंतर पुढील ३० मिनीटांमध्ये लेखी स्वरुपात घ्यावी लागेल. त्यासाठी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे आगाऊ २,५००/- रूपये भरून पावती घ्यावी. ३० मिनीटांनंतर आलेल्या हरकतीचा विचार करण्यात येणार नाही वा दखल घेतली जाणार नाही. अशा हरकतीबाबत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचा / अपील कमीटीचा निर्णय अंतिम असेल. कोणत्याही परिस्थितीत हरकत फी परत केली जाणार नाही.**



# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

CAM Cycling Association Of Maharashtra

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९

| अॅड. विक्रम रोठे | प्रताप जाधव | प्रा. संजय साठे | भिकन अंबे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | संघटन सचिव | सचिव | खजिनदार |




२४) **<u>वयाच्या पुराव्यासाठी नोंदणी अर्ज व्यवस्थीत वाचून त्याची पूर्तता करावी.</u>**

२५) **<u>सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे नांव नोंदणी नसलेल्या सायकपट्टूंना या स्पर्धेत किंवा सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने आयोजित केलेल्या किंवा सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने मान्यता दिलेल्या कोणत्याही सायकल स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही.</u>**

२६) **सर्व जिल्हा संघटनानी आपापल्या जिल्ह्याच्या निवड चाचणी / अजिंक्यपद स्पर्धा घेऊनच आपला जिल्ह्या संघ निवड करावयाची आहे.**

२७) **<u>लिंकद्वारे *अर्ज व्यवस्थीत भरुन त्याप्रमाणे प्रवेश* खर्चाची सर्व रक्कम सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या बँक खात्यामध्ये भरावी.</u>**

२८) <u>स्पर्धे दरम्यान खेळाडू आयत्यावेळी आपला विविध प्रकारामधील प्रवेश रद्द करतात मात्र त्याची सूचना संयोजकांना देत नाहीत तसेच स्टार्टींग लाईनवर वेळेत येत नाहीत या व इतर बाबींमुळे स्पर्धा निर्धारीत वेळेत पार पाडणे शक्य होत नाही. तरी याबाबत सर्वांनी सहकार्य करावे. स्टार्टींग ऑर्डर व दिलेल्या वेळेप्रमाणे आपापल्या वेळेस सायकलपट्टूंनी हजर रहावे.</u> भारतीय सायकलिंग महासंघ (सी.एफ.आय.) च्या नियमानुसार संबंधीतांवर रोख दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२९) स्पर्धा भारतीय सायकलिंग महासंघ (सी.एफ.आय.) आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (कॅम) यांनी केलेल्या नियमांनुसार तसेच या नियमांत वेळोवेळी केलेल्या बदलानुसार होईल.

३०) ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंना स्पर्धा मार्गावर सराव करावयाचा आहे त्यांनी स्वखर्चाने व स्वत:चे जबाबदारीवर करावयाचा आहे.

३१) **एकच सायकल दोघांमध्ये वापरावयाची असेल तर त्यासाठी रुपये ५००/- खर्चापोटी अगोदर जमा करुन त्याप्रमाणे लेखी परवानगी घ्यावी लागेल. आयत्यावेळी एकच सायकल दोघात वापरण्यास परवानगी देण्यात येणार नाही.**

३२) **योग्य हेल्मेट शिवाय सायकलपट्टूस स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. योग्य हेल्मेट नसल्यास स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.**

३३) **स्पर्धेदरम्यान हेल्मेट डोक्यामधून काढल्यास किंवा त्याचे बक्कल काढल्यास किंवा ते ढीले बांधलेले आढळल्यास संबंधीताचा त्याक्षणी स्पर्धेमधील सहभाग रद्द करण्यात येईल.**

३४) **स्पर्धेदरम्यान स्पर्धकाने कोणत्याही कारणाने हॅण्डेलवरील दोन्ही हाथ सोडल्याचे निर्दर्शनास आल्यास त्याक्षणी त्या स्पर्धकाचा स्पर्धेमधील प्रवेश रद्द करण्यात येईल.**



CYCLING for Health...Strength.... & Pollution free INDIA.


**पत्रव्यवहाराचा पत्ता**

डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**

इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**

**संपर्क :** 942 233 6808 **ई–मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com

**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com


KREEDA JAGRUTI

३५) सर्व सायकलपट्टूंनी नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. बेशिस्त खेळाडू तसेच उद्धट खेळाडूविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रशिक्षक, व्यवस्थापक वा पालक यांच्यामुळे स्पर्धेत अडथळा आल्यास संबंधीतांच्या स्पर्धकावर स्पर्धेमधून निलंबनाची कारावाई करण्यात येईल.

**३६) स्पर्धेदरम्यान सायकलपट्टूंना मोबाईल फोन अथवा कानामधील ऐकण्याचे मशिन (ईअरींग) वापरता येणार नाहीत. असे करताना खेळाडू आढळल्यास या स्पर्धेमधील संबंधीत सायकपट्टूचा सहभाग त्याक्षणी रद्द करण्यात येईल.**

३७) कोणत्याही कारणाने स्पर्धे ठिकाणी वा स्पर्धेदरम्यान स्पर्धकाने वा त्याच्याशी संबंधीत इतरांनी पंच, पायलेट, तांत्रिक अधिकारी यांच्याशी परस्पर संपर्क साधायचा नाही वा चर्चा करायची नाही वा मोबाईल करावयाचा नाही. तसे आढळल्यास संबंधीत स्पर्धकास त्या स्पर्धेमधून निलंबीत करण्यात येईल. कोणसही काहीही शंका असल्यास श्री प्रताप जाधव किंवा प्रा. संजय साठे यांच्याकडेच संपर्क साधावयाचा आहे.

३८) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी कोणत्याही कारणाने स्पर्धक उशीरा हजर झाला तर त्यास रु. २०० दंड आकारण्यात येईल.

३९) स्टार्टींग ऑर्डर प्रमाणे स्पर्धक हजर न राहील्यास किंवा स्टार्टींग ऑर्डर मधील स्पर्धाकाचा क्रम चूकल्यास जास्तीत जास्त दोन मिनीटांपर्यंत संबंधीत स्पर्धकास रुपये ५०० स्पर्धा खर्च आकारुन सोयीनुसोर स्टार्ट देण्यात येईल.

४०) स्टार्टींग ऑर्डर प्रमाणे स्पर्धक हजर न राहील्यास किंवा स्टार्टींग ऑर्डर मधील स्पर्धाकाचा क्रम चूकल्यास अशा स्पर्धकास स्पर्धेत सहभाग घ्यायचा असल्यास रु. १,००० स्पर्धा खर्च आकारुन स्टार्ट देण्यात येईल. स्टार्ट केव्हा द्यायचा याचा निर्णय स्पर्धे ठिकाणचे पंच व अधिकारी ठरवतील.

**४१) फिटींग झोन शिवाय फिडींग वा पाणी देणे असे प्रकार करु नयेत, असे कोणी आढळल्यास संबंधीतांच्या स्पर्धकावर कारवाई करण्ययात येईल.**

४२) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी किंवा स्पर्धा सुरु असताना कोणीही प्रशिक्षक, व्यवस्थापक, पालक किंवा स्पर्धकाशी संबंधीत इतर कोणीही स्पर्धेस अडथळा होईल, सायकलपट्टूस व्यत्त्यय होईल असे कोणतेही कृत्त्य करु नये, तसे करताना आढळल्यास त्या व्यक्तीशी संबंधीत सायकलपट्टूवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

४३) स्पर्धेमध्ये पाणी वा फिडींग नियमानुसार दिले जाईल. केवळ त्या स्पर्धकाचे प्रशिक्षकच फिडींग वा पाणी देऊ शकतात. **ठरवून दिलेल्या फिडींग झोन मध्येच पाणी वा फिडींग देता येईल.**



# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन अॅक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९



**अॅड. विक्रम रोठे** अध्यक्ष | **प्रताप जाधव** संघटन सचिव | **प्रा. संजय साठे** सचिव | **भिकन अंबे** खजिनदार




४४) फिडींग झोन व्यतिरीक्त इतर ठिकाणी स्पर्धक स्वत: जवळील फिडींग वा पाणी वापरु शकतो. फिडींग झोन शिवाय इतर ठिकाणी स्पर्धक पाणी वा फिडींग घेताना आढळल्यास अशा स्पर्धकास अशा प्रत्येक प्रसंगी रुपये २०० स्पर्धा दंड आकारण्यात येईल व अशा तीन प्रसंगानंतर त्या स्पर्धकास १ मिनीटांची पेनेल्टी होईल.(अशा स्पर्धकाने दिलेल्या एकूण वेळेमध्ये एक मिनीटांची वेळ वाढवण्यात येईल.)

४५) फिडींग झोनमध्ये फिडींग वा पाणी घेताना इशारा करुन अगोदर एका बाजूस यावे व आपल्या प्रशिक्षकास इशारा व आवाज द्यावा आणि फिडींग वा पाणी घ्यावे. मास स्टार्ट स्पर्धेदरम्यान बंचच्या पुढे किंवा अचानक एका बाजूला जाऊन फिडींग वा पाणी घेण्याचा प्रयत्न करु नये. बंचच्या शेवटी येऊन फिडींग वा पाणी घ्यावे. कोणत्याही परिस्थीतीमध्ये इतर सायकलपटूंना धोका होईल असे वर्तन करु नये, तसे आढळल्यास दंडात्मक वा स्पर्धेमधून निलंबन अशी कारवाई करण्यात येईल.

४६) आयत्यावेळी उदभवलेल्या कोणत्याही कारणाने स्पर्धा कार्यक्रमात बदल करण्याचे अधिकार सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र वा संयोजकांस आहेत. हे सर्व बदल सहभागी सर्वांवर बंधनकारक असतील.

४७) सर्व जिल्हा संघटना व सायकलपटूंनी वरील बाबींची नोंद घ्यावी व नेहमीप्रमाणे सहकार्य करावे ही विनंती. कळावे, धन्यवाद.

आपले स्नेहांकित

प्रताप जाधव
स्पर्धा संचालक व संघटन सचिव

प्रा. संजय साठे
सचिव,

प्रत माहितीसाठी :-

१. मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. प्राचार्य, क्रीडा प्रबोधिनी, पुणे

CYCLING for Health...Strength.... & Pollution free INDIA.


**पत्रव्यवहाराचा पत्ता**
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

CAM Cycling Association Of Maharashtra

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९

| ॲड. विक्रम रोठे | प्रताप जाधव | प्रा. संजय साठे | भिकन अंबे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | संघटन सचिव | सचिव | खजिनदार |


स्टेटएमटीबी/२०२२-२३/पान क्र.६७

## या स्पर्धेसाठी वयोगट आणि ईव्हेंट लिस्ट खालीलप्रमाणे राहील

The age group and event list for this competition will be as follows

| | Elite Men (Born in 2003 & Before) | Laps | Elite Women (Born in 2003 & Before) | Laps |
|---|---|---|---|---|
| SI No. | Events | | Events | |
| 1 | XCT (Cross Country Time Trial) | 3 | XCT (Cross Country Time Trial) | 2 |
| 2 | XCO (Cross Country Mass Start) | 4 | XCO (Cross Country Mass Start) | 3 |
| 3 | Team Realay (2 Men + 2 Women Riders in each Team) | | | |
| | **Men Junior (Born in 2004 & 2005)** | | **Women Junior (Born in 2004 & 2005)** | |
| 1 | XCT (Cross Country Time Trial) | 2 | XCT (Cross Country Time Trial) | 2 |
| 2 | XCO (Cross Country Mass Start) | 3 | XCO (Cross Country Mass Start) | 2 |
| 3 | Team Realay (2 Men + 2 Women Riders in each Team) | | | |
| | **Sub Junior Boys (Born in 2006 & 2007)** | | **Sub Junior Girls (Born in 2006 & 2007)** | |
| 1 | XCT (Cross Country Time Trial) | 1 | XCT (Cross Country Time Trial) | 1 |
| 2 | XCO (Cross Country Mass Start) | 2 | XCO (Cross Country Mass Start) | 2 |
| | **Youth Boys(Born in 2008, 2009 & 2010)** | | **Youth Girls (Born in 2008, 2009 & 2010)** | |
| 1 | XCT (Cross Country Time Trial) | 1 | XCT (Cross Country Time Trial) | 1 |
| 2 | XCO (Cross Country Mass Start) | 2 | XCO (Cross Country Mass Start) | 2 |

**Ratap Jadhav**
Org. Secretary

**Prof. Sanjay Sathe**
Secretary

Cycling Association of Maharashtra




CYCLING for Health...Strength.... & Pollution free INDIA.

पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
संपर्क : 942 233 6808 ई-मेल : cyclingassociationmaharashtra@gmail.com
बेवसाईट : www.cyclingassociationofmaharashtra.com

KREEDA JAGRUTI